# प्रादेशिक हवामान पूर्वानुमान केंद्र, मुंबई आणि डॉ. बाळासाहेब सावंत कोंकण कृषि विद्यापीठ, दापोली

## हवामानावर आधारीत कृषि सल्ला (ठाणे व पालघर जिल्हा)

**(०२३५८) २८२३८७**

**अंक १४/२०१९** **दिनांक १५/०२/२०१९** **कालावधी ५ दिवस**


**डॉ. सुभाष चव्हाण,**
विभाग प्रमुख,
कृषिविदया विभाग
९४२२४३१०६७

**डॉ. विजय मोरे,**
नोडल ऑफिसर,
कृषिविदया विभाग
९४२२३७४००१

**डॉ. शितल यादव,**
तांत्रिक अधिकारी
कृषिविदया विभाग
८३७९९०११६०


| मागील हवामान आठवडा सारांश (दिनांक ०९/०२/२०१९ ते १५/०२/२०१९) | | | | | | | हवामानाचे घटक | हवामान पूर्वानुमान (दिनांक १६/०२/२०१९ सकाळी ८:३० पासून २०/०२/२०१९ सकाळी ८:३० वाजेपर्यंत) | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ०९/०२ | १०/०२ | ११/०२ | १२/०२ | १३/०२ | १४/०२ | १५/०२ | | १६/०२ | १७/०२ | १८/०२ | १९/०२ | २०/०२ |
| ०.० | ०.० | ०.० | ०.० | ०.० | ०.० | ०.० | पाऊस (मिमी) | ० | ० | ० | ० | ० |
| २३.६ | २९.६ | ३०.० | ३१.८ | ३४.२ | ३३.२ | ३१.८ | कमाल तापमान (अं.से) | ३५ | ३५ | ३४ | ३४ | ३६ |
| ९.२ | १०.२ | १२.४ | १६.० | १९.० | १७.८ | १६.६ | किमान तापमान (अं.से) | २० | १९ | १९ | २० | २१ |
| ० | ० | ० | ० | ० | ० | ० | मेघाच्छादन (ऑक्टा) | ० | ० | ० | ० | ० |
| ६० | ७० | ८० | ७७ | ५२ | ८३ | ९० | सकाळची सापेक्ष आर्द्रता | ५८ | ४२ | ४० | ३९ | ३९ |
| ४४ | ४४ | ३० | २७ | ३३ | ३२ | - | दुपारची सापेक्ष आर्द्रता | ३८ | २५ | २३ | २३ | २१ |
| ३.९ | ३.७ | २.५ | २.४ | २.३ | ३.० | ३.० | वाऱ्याचा वेग (किमी/तास) | ७ | ३ | ३ | ४ | ३ |
| आ.द. | शांत | शांत | शांत | नै.द. | शांत | शांत | वाऱ्याची दिशा | ई.ऊ. | ई. | ई. | ई. | ई.पू. |

| पाऊस (मिमी) मागील आठवडयातील | पाऊस (मिमी) १/१/२०१८ पासून आजपर्यंत | पाऊस (मिमी) गेल्या वर्षीचा |
|---|---|---|
| ०.० | ०.० | २३५९.६ |

### हवामान पूर्वानुमान कृषि सल्ला

**दिनांक १६ ते २० फेब्रुवारी २०१९ पर्यंत कमाल व किमान तापमानात वाढ होण्याची शक्यता आहे**

| पिक | अवस्था | कृषि सल्ला |
|---|---|---|
| उन्हाळी भात | फुटवे अवस्था | • उन्हाळी भात पिकास नत्राचा दुसरा हप्ता फुटवे येण्याच्या वेळी (पुनर्लागवडीनंतर ३० ते ४० दिवसांनी) हेक्टरी ४० कि.ग्रॅ. नत्र (८७ कि.ग्रॅ. युरिया प्रती हे.) देण्यात यावा तसेच भात खाचरात पाण्याची पातळी ५ ते १० सें. मी. ठेवावी. |
| वाल | काढणी अवस्था | • वाल पिकाची काढणी जसजशा शेंगा वाळतील तसतशी शेंगांची तोडणी करून ४ ते ५ दिवस शेंगा उन्हात वाळवाव्यात व मळणी करावी किंवा शेंगा झाडावर वाळल्यानंतर पिकाची कापणी करून झाडे खळ्यावर ३ ते ४ दिवस उन्हात वाळवावीत व नंतर मळणी करावी. साठववणूकीमध्ये भुंग्याचा उपद्रव टाळण्यासाठी वालाचे दाणे मातीच्या खळीचा थर देऊन चांगले वाळवावे. |
| आंबा | मोहोर व फलधारणा अवस्था | • सध्या आंबा पिकामध्ये मोहोर फुटण्याची व वाटाण्याच्या आकाराची फळे येण्याची अवस्था असून त्यावर तुडतुड्याचा आणि करपा रोगाचा प्रादुर्भाव होण्याची शक्यता असल्यामुळे मोहोर संरक्षण वेळापत्रकानुसार चौथी फवारणी (तिसऱ्या फवारणीनंतर १५ दिवसांच्या अंतराने) थायमेथाक्झाम २५ टक्के डब्ल्यु. जी. १ ग्रॅम + भुरी रोगाच्या नियंत्रणासाठी ५ टक्के हेक्झाकोनॅझोल ५ मि. ली. किंवा पाण्यात विरघळणारे ८० टक्के गंधक २० ग्रॅम + करपा रोगाच्या नियंत्रणासाठी कार्बेन्डाझीम १२ टक्के + मॅन्कोझेब ६३ टक्के १० ग्रॅम. प्रति १० लिटर पाण्यातून फवारणी करावी.<br>• हवामान अंदाजानुसार तापमानात वाढ संभवत असल्याने आंब्याची फळगळ होण्याची शक्यता असल्याने फळगळ कमी करण्यासाठी फलधारणा झाल्यावर चौथ्या फवारणीपासून ते सहाव्या फवारणीपर्यंत फवारणीच्या द्रावणात २ टक्के युरिया (२०० ग्रॅम प्रती १० लिटर पाण्यातून) मिसळून फवारणी करावी किंवा आंब्यास मोहोर येऊन फळे वाटाणा, गोठी व अंडाकृती असताना १ टक्का पोटशियम नायट्रेटच्या तीन वेळा फवारणी करावी.<br>**सूचना:** युरिया पाण्यात पूर्णपणे मिसळल्यानंतर त्यात कीटकनाशक मिसळावे.<br>• फळगळ कमी करण्यासाठी फलधारणा झाल्यावर पाण्याच्या उपलब्धतेनुसार १५० ते २०० लिटर पाणी प्रती झाडास या प्रमाणात १५ दिवसांच्या अंतराने ३ ते ४ पाळ्या दयाव्यात.<br>• फळ वाटणा आकारचे असताना फळाचा आकार, फळाचे वजन फळामधील साका आणि फळमाशीपासून संरक्षण करण्यासाठी २५ x २० आकाराची पेपर पिशवी लावावी. |
| नारळ | - | • नारळाच्या पाच वर्षावरील माडास ७५० ग्रॅम युरिया व ६६७ ग्रॅम म्युरेट ऑफ पोटाश असा खताचा तिसरा हप्ता दयावा. खते नारळाभोवती १.५ ते १.८ मीटर अंतरावर मातीत मिसळून दयावीत व खते दिल्यानंतर माडास पाणी दयावे. |
| फुलपिके | फुल अवस्था | • अॅस्टर पिकामध्ये तोडणीस तयार असलेल्या फुलांची तोडणी करावी. फक्त फुलांची तोडणी करावयाची असल्यास सकाळी लवकर करावी व पूर्ण झाड फुलदांडासाठी वापरावयाचे असल्यास सायंकाळी झाड छाटून ताबडतोब स्वच्छ पाण्यामध्ये ठेवावे. |
| भाजीपाला/ फळबाग रोपवाटिका | काढणी अवस्था | • काढणीस तयार झालेल्या भाजीपाला पिकांची काढणी करावी<br>• फळबाग रोपवाटिकेस, नवीन लागवड केलेल्या फळबागा तसेच भाजीपाला पिकास पाणी देण्याची व्यवस्था करावी. |
| दुभती जनावरे/ शेळ्या/ कुकुटपालन | - | • जनावरांना पिण्यासाठी स्वच्छ पाणी पुरवठ्याची व्यवस्था करावी.<br>• दिवसाचे कमाल तापमानात वाढ संभवत असल्याने पक्ष्यांचे उष्णतेपासून संरक्षण करावे. |

**सदर कृषि सल्ला पत्रिका डॉ. बाळासाहेब सावंत कोंकण कृषि विद्यापीठ, दापोली येथील ग्रामीण कृषि मौसम सेवा योजनेतील तज्ञ समितीच्या शिफारशीवरून तयार करून प्रसारित करण्यात आली.**

**अधिक माहितीसाठी नजीकच्या कृषी विद्यापीठाचे केंद्र किंवा महाराष्ट्र शासनाचे कृषी अधिकारी यांच्याशी संपर्क करावा**